नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/11/2022 (रविवार) सकाळ

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :- अंतर्गत केसलापुर मौदा येथे दिनांक १२/११/२०२२ चे ११.३० ते १२.२० वा. पर्यंत दरम्यान पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ हे पोलीस स्टेशन मौदा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना खास मुकबिरव्दारे माहिती मिळाली की, केसलापूर येथून मौदाकडे एक अवैधरीत्या विनापरवाना ट्रॅक्टरमध्ये रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौदा पोलीस स्टाफ यांनी नाकाबंदी दरम्यान रामटेक रोड ते मौदाकडे येतांनी लाल रंगाचा ट्रॅक्टर एम.एच.-४०/सी.डी-५७९७ याला हात दाखवुन थांबविले असता त्याची ट्रॅक्टर ट्रॉली चेक केले असता रेती भरून दिसुन आल्याने त्याला ट्रॉलीचे व मालाचे कागदपत्राबाबत विचारपूस केली असता त्याने कागदपत्र जवळ नसल्याचे सांगितले. सदर रेती ही केसलापूर नदीतून स्वत: ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये रेती भरून चोरी करून घेवुन जात असल्याचे सांगितले. ट्रॅक्टर चालकास त्याचे नाव विचारले असता ट्रॅक्टर चालक व मालक आरोपी नामे- विक्की विठठल मेश्राम, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, केसलापूर मौदा असे सांगितले. आरोपीने आपल्या ट्रॅक्टर ट्रॉली क्र. एम.एच.-४०/सी.डी-५७९७ किमती अंदाजे ८,००,०००/-रू. मध्ये विना परवाना व अवैधरीत्या ०१ ब्रॉस शासकीय रेती किंमती २,०००/- रु. असा एकुण ८,०२,०००/- रुपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे-पोलीस हवालदार गौतम मेश्राम, ब. नं १६९ पोलीस स्टेशन मौदा यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.






## घरफोडी

पो.स्टे. खापा :— अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील बडेगाव येथे दिनांक १२/११/२०२२ चे १०.०० वा. ते ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अमुल नारायण सुके, वय २६ वर्ष, रा. बडेगाव आपल्या घराच्या दाराला कुलुप लावुन मेडीकल स्टोर्स मध्ये सकाळी ०८.३० वा. दरम्यान गेले असता दिवसभर मेडीकल मध्ये राहुन सायंकाळी ०५.०० वा. मोल्करीणने सांगितले की, त्यांच्या घरी चोरी झाली आहे. तिचे सांगणेवरून घरी जावुन पाहीले असता कोणीतरी अज्ञात आरोपीने त्यांच्या घराचा दरवाज्याचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधुन १) नगदी ५००रू. चा नोटांचा एक बंडल असा एकुण किमती ५०,०००/—रूपयाचा एक बंडल, २) १०० रू. नोटाचा बंडल किमती १०,०००/—रू., ३) २०/—रू. नोटाचे ०३ नग किमती किमती ६,०००/—रू. असा एकुण ६६,०००/—रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापा करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर